पुढारी

# आंतरराष्ट्रीय वेबिनारला शिवाजी विद्यापीठात प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज व कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे उद्घाटन ऑनलाईन झाले.

यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. विलास नादवडेकर, कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, अ‍ॅड. व्ही. एन. पाटील, अ‍ॅड. वैभव पेडणेकर, नितीन दळवाई व ऑलिम्पिक खेळाडू वीरधवल खाडे उपस्थित होते. सर्बियातून डॉ. गॉर्डना मार्कोविक, डॉ. ब्रान्को सिसिक, लेबानानमधून वालीद मार्सेल, फिलिपिन्सहून बॉन्ग पास्कुअल, डॉ. संदीप देवल व संग्राम चौगुले यांनी ऑनलाईन संदेश दिले.

पहिल्या सत्रात डॉ. संदीप देवल यांनी 'सर्वासाठी आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्ती' आणि डॉ. गॉर्डना मार्कोविक- सर्बिया यांनी 'स्त्रियांचे आरोग्य आणि तंदुरुस्ती' या विषयावर विवेचन केले. डॉ. पी. टी गायकवाड, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. अशोक बन्ने, सुजय खोपडे, डॉ. के. जी. कांबळे, डॉ.एन. एच. जाधव, विनायक साळोखे, डॉ. सुषमा चौगुले, टी. ए. हिलगे, प्रवीण साळवी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सोमवारी दुपारी वेबिनारला सुरुवात होणार आहे.

# दोन महिन्यात होणार नव्या कुलगुरूंची निवड

## शोध समितीचे संपर्क अधिकारी आर. के. जैन यांची माहिती : इच्छुकांच्या संख्येत वाढ



- **कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पोस्टाने अर्ज पाठवण्यासाठी १० जुलैपर्यंत मुदतवाढ**
- **कॅम्पसवरील कुलगुरू हवा : विद्यापीठ वर्तुळात चर्चा**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ नवीन कुलगुरूपदाच्या निवडीची प्रक्रिया सुरू आहे. या पदासाठी प्र-कुलगुरू, प्रोफेसर, प्राचार्य, अधिष्ठाता, संचालक पदावरील उमेदवारांनी अर्ज केले आहेत. इच्छुक असलेल्या सुमारे ३० उमेदवारांपैकी विद्यापीठ परिक्षेत्रातील तब्बल १५ जणांचा समावेश आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पोस्टाने अर्ज पाठवण्यासाठी १० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. येत्या दोन महिन्यात नव्या कुलगुरूंची नियुक्ती केली जाईल, अशी माहिती कुलगुरू शोध समितीचे संपर्क अधिकारी आर. के. जैन यांनी दिली.

कुलगुरू पदाच्या शर्यतीमध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, औरंगाबाद, मुंबई, नवी दिल्ली येथील जेएनयू विद्यापीठातील दिग्गजांची नावे पुढे येत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन, शोधनिबंध, अध्यापन, प्रशासकीय कामाचा अनुभव, पीएच.डी., एम.फिल. विद्यार्थ्यांची संख्या, आदी गुणवत्तेवर कुलगुरूपदासाठी निवड होणार आहे. अर्ज केलेल्या सर्वच उमेदवारांचा बायोडेटा स्ट्राँग आहे. त्यामुळे कुलगुरूपदावर कोणाची वर्णी लागणार याकडे राज्यभरातील शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे. १० जुलैला अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर राज्यपालांनी नेमलेल्या त्रिस्तरीय कुलगुरू शोध समितीतर्फे अर्जांची छाननी होईल. यानंतर कच्ची यादी जाहीर करण्यात येईल. त्यानंतर हरकती, दुरूस्तीसह अंतिम यादी जाहीर होणार. त्यानंतर अंतिम यादीतील उमेदवारांच्या मुलाखतीमधून एका उमेदवाराची कुलगुरूपदासाठी नियुक्ती केली जाणार आहे. यामध्ये जवळपास दोन महिन्यांचा कालावधी जाण्याची शक्यता आहे.

**इतर विद्यापीठातील उमेदवार**

पुणे विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. संजय सोनवणे, इंटरनॅशनल स्टडीज सेंटरचे डॉ. विजय खरे, मानव्य विज्ञान विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, मुंबई विद्यापीठाचे डॉ. दिलीप पाटील, दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील इतिहास विषयाचे प्रोफेसर डॉ. उमेश कदम, स्कूल ऑफ सायन्सेसचे प्रोफेसर डॉ. अरूण खरात, विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. आर. व्ही. शेजवळ, सोलापूर विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एस. आय. पाटील, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांची नावे चर्चेत आहेत.

**शिवाजी विद्यापीठ कॅम्पसवरील उमेदवार**

माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नॅनो टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे डॉ. आण्णासाहेब गुरव, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले, अर्थशास्त्र माजी विभागप्रमुख डॉ. विजय ककडे, डॉ. पी. एस. कांबळे, पदार्थविज्ञान विभागाचे डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. राजेंद्र सोनकवडे, ॲग्रो केमिकल ॲंड पेस्ट मॅनेजमेंट विभागाचे डॉ. एस. एस. चव्हाण, बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या डॉ. ज्योती जाधव, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे, यांच्यासह अन्य उमेदवारांनी अर्ज केल्याचे वृत्त आहे.

**कॅम्पसवरील कुलगुरू हवा...**

विद्यापीठ कॅम्पसवरील उमेदवाराची कुलगुरूपदी निवड व्हावी, अशी विद्यापीठ वर्तुळात चर्चा आहे. कॅम्पसवरील अनेकांनी कुलगुरूपदासाठी अर्ज केला असला तरी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. पी. एस. पाटील यांची नावे आघाडीवर आहेत. डॉ. शिर्के यांना प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. तर डॉ. पी. एस. पाटील हे मटेरियल सायन्स विषयातील भारतातील पहिल्या दहा संशोधकांपैकी एक आहेत. त्यांना संशोधनासह प्रशासनाचाही अनुभव आहे. त्यामुळे कॅम्पसवरील डॉ. शिर्के आणि डॉ. पाटील या दोघांमध्ये स्पर्धा होण्याची शक्यता आहे.

तरुण भारत Mon, 06 July 2020
https://epaper.tarunbharat.com/c/53257556

# विद्यापीठ, बास्केटबॉल संघटनेतर्फे वेबिनार



कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठ, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज, जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले होते. यात परदेशातील तज्ज्ञही सहभागी झाले होते. पहिल्या सत्रात डॉ. संदीप देवल यांनी सर्वांसाठी आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि डॉ. गॉर्डना मार्कोविक (सर्बिया) यांनी स्त्रियांचे आरोग्य आणि तंदुरुस्ती या विषयावर विवेचन केले. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, अॅड. व्ही. एन. पाटील, अॅड. वैभव पेडणेकर, नितीन दळवाई, ऑलिंपिक खेळाडू वीरधवल खाडे प्रमुख उपस्थित होते.

सर्बियातून डॉ. गॉर्डना मार्कोविक, डॉ. ब्रान्को सिसिक, लेबानानमधून वालीद मार्सेल, फिलीप्पीन्सहून बॉन्ग पास्कुअल, डॉ. संदीप देवल व संग्राम चौगुले यांनी ऑनलाइन संदेश दिले. सोमवारी (ता. ६) ४ वाजता वेबिनार सुरु होईल, असे संयोजकांनी कळविले आहे.

प्र. संचालक शिवाजी विद्यापीठ- डॉ. पी.टी गायकवाड, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, वेबिनारचे समन्वयक डॉ. शरद बनसोडे, डॉ.अशोक बन्ने, सुचय खोपडे, डॉ.के.जी. कांबळे, डॉ. एन. एच. जाधव, विनायक साळोखे, डॉ. सुषमा चौगुले, सौ. टी. ए. हिलगे, प्रवीण साळवी यांनी नियोजन केले.